MHKO050005072019

**नियमित दिवाणी दावा क्र.३५/२०१९** मधील निशाणी**२१** खालील आदेश–

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी व त्यांची कैफियत दावेत सामील करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींनी आपल्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, ते मुदतीत कैफियत दाखल करणार होते परंतु त्यांना या कामातील महत्वाची माहिती व कागदपत्रे वेळेत मिळाली नाहीत. म्हणून त्यांना वकीलांची भेट घेवून वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. म्हणून कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. तो विलंब त्यांनी जाणूनबुजून केलेला नाही. प्रस्तुत कामातील वस्तुस्थिती दावे कामी येणेकरिता प्रतिवादी यांची कैफियत सामील करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादींची कैफियत दाखल करुन घेतल्यास न्यायास मदत होवून प्रतिवादींचे अपरिमित असे नुकसान टळणार आहे. शेवटी प्रतिवादींनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. वादींनी अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविली. वादींनी आपल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले की प्रतिवादी यांनी खोटी व चुकीची कारणे दिलेली असून केलेला विलंब हा जाणूनबुजून केलेला आहे. प्रतिवादी प्रत्येक तारखेस काहीनाकाही कारण देऊन दावेस विलं करित आहेत. अशा परिस्थितीत त्यांचा अर्ज मंजूर झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. शेवटी वादींनी सदरचा अर्ज हेवी कॉस्टसहित नामंजूर करण्याची विनंती केली.

४.      दाव्याचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादीं विरुध्द वाटणीसाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्याची संधी देवून त्यांचा बचाव करण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार आवश्यक आहे. तसे केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी प्रतिवादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होवून त्यांना आपला बचाव करण्याची संधी मिळणार नाही. परंतु प्रतिवादी यांनी आपली कैफियत मुदतीत दाखल केलेली नसल्यामुळे प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून काही रक्कम प्रतिवादी यांनी वादींना अदा करणेबाबत आदेश करणे न्यायोचित ठरेल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१.   अर्ज मंजूर करण्यात येतो .

२.   प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून प्रतिवादी यांनी वादीस रक्कम रु. २००/- अदा करावी.

येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात उद्घोषित.

सही/-
**(**सौ**.** ए**.** एस**.** जाधव **)**
दिनांक :- ०३.०७.२०१९.          ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
इचलकरंजी.

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | J. V.Patil |
| Name of Court | V. D. Sungare,<br>5th Jt.C.J.J.D., Ichalkaranji |
| Date of Dictation | 03/07/2019 |
| Order signed by the P.O. on | 03/07/2019 |
| Order uploaded on | 04/07/2019 |